


करून पाहूया



# आइस्क्रीम स्टिक मॅन

मित्रांनो, तुम्ही आइस्क्रीम खाऊन त्याच्या काड्या टाकून देता ना? या काड्यांचा वापर करून आपण एक 'स्टिक मॅन' करूया. यासाठी आइस्क्रीमच्या चार काड्या, सीडी, पाण्याच्या बाटलीची दोन झाकणे, जुना स्केचपेन, चार छोटी गोलाकार लोहचुंबके आणि डिंक घ्या.

प्रथम या 'स्टिक मॅन'चा बेस बनवून घ्या. यासाठी जुनी सीडी घेऊन त्याच्या मध्यभागी बाटलीचे झाकण चिकटवून त्याला एक छिद्र पाडा. या छिद्राचा आकार उलटा स्केचपेन बसेल इतकाच ठेवा. हा बेस तयार झाल्यानंतर आता त्यावर तोल सांभाळणारा 'स्टिक मॅन' बनवा. यासाठी पाण्याच्या बाटलीचे आणखी एक झाकण घेऊन त्यावर डोळे आणि तोंड रेखाटा. झाकणाला एक एका बाजूने टोक काढलेली आइस्क्रीमची काडी चिकटवा. हात बनविण्यासाठी दुसऱ्या काडीचे दोन तुकडे करून तिरपे चिकटवा. यानंतर 'स्टिक मॅन'चे पाय बनविण्यासाठी तिसरी काडी मध्यभागी कापून तिरपी चिकटवा. या काड्यांना दोनही बाजूंनी छोटी गोलाकार लोहचुंबके लावा. हा 'स्टिक मॅन' आपण तयार केलेल्या स्टँडमध्ये, खाचेमध्ये बसवलेल्या स्केचपेनवर लावा आणि या मजेदार खेळण्याची मजा लुटा.

आयुका विज्ञान केंद्र, पुणे